ISSN 2278-5914

# Satara Itihas Sanshodhan Mandal, Satara

(Inst. Reg. No. Maharashtra/13482/Satara/2010)

Research Booklet

# SANSHODHAN
# संशोधन



प्रतिसरकारचे अध्वर्यू-क्रांतिसिंह नाना पाटील

**१९४२ चे चलेजाव आंदोलन : अमृत महोत्सवी वर्ष**

ISSN 2278-5914

**Satara Itihas Sanshodhan Mandal, Satara**
(Inst. Reg. No.Maharashtra/13482/satara/2010)
**E-mail ID : sisms2010@gmail.com**

Research Booklet

# SANSHODHAN

# संशोधन

*** Chief Editor ***

Dr. Vishvanath Pawar

*** Co-Editorial Board ***

Dr.Ajitkumar Jadhav
Dr.Jaypal Sawant
Dr.Sumit Yadav
Prof. Mahadev Chinde

**2017**

# Seventh Annual Conference and National Conference
# Lal Bahudar Shastri College, Satara

Research Booklet

# SANSHODHAN

**Publisher :**

**Dr. Vinayakrao Jadhav**

**President, Satara Itihas Sanshodhan Mandal, Satara.**
**Flat No.2, 'Saivihar', Sadar Bazar, Satara.**
**Mob.: 9850279506**

**Editor :**

**Dr. Vishvanath Pawar**

**The Chief Executive, Satara Itihas Sanshodhan Mandal, Satara.**
**Mob.: 7798122026, 8698909707.**

**Printer :**

**Sidhivinayak Enterprises**
**322, Yadogopal Peth Satara**
**Mob.: 9420771326**

**First edition : 8 October 2017**

**Donated Value : Rs.250/-**

**(All rights reserved under the Satara Itihas Sanshodhan Mandal, satara )**
**(The views expressed by the authors in 'Sanshodhan' Reaserch Booklet in this issue are there own. The editor and publisher are not responsible for them)**

३२. धावडशीचे ब्रह्मेंद्रस्वामी
प्रा.डॉ.कोरडे दत्तात्रय ज्ञानदेव ८८
३३. किल्ले अजिंक्यतारा : एक भौगोलिक व ऐतिहासिक अवलोकन
प्रा.डॉ.अशोक श्रीरंग खाडे ९१

## आधुनिक विभाग

३४. रमाबाई आंबेडकरांनी गृहिणींना दिलेली 'स्वत्वाची जाणीव' -अब्राह्मणी स्त्रीवादाच्या चर्चाविश्वाच्या कंगोऱ्यातून एक चिंतन''
डॉ.गीतांजली भी.बोराडे ९३
३५. राजर्षि शाहू आणि भारतीय प्रश्न
प्रा.डॉ.मंजुश्री जयसिंगराव पवार ९७
३६. १८५७ सातारा परिसरातील हत्यारे, शस्त्रास्त्रे सरकार जमा करण्यासंबधीची अप्रकाशित कागदपत्रे
डॉ.चंद्रकांत जगन्नाथ अभंग ९९
३७. ना.गोपाळ कृष्ण गोखले : व्यक्ति व संस्थापन भारत सेवक समाज
प्रा.श्रुती राजेंद्र भातखंडे १०५
३८. कोल्हापूरच्या चित्रपटसृष्टीस 'प्रभात फिल्म कंपनी'चे योगदान
प्रा.डॉ.कविता अशोक गगराणी ११०
३९. धरण आणि भुकंप यांचा परस्पर संबंध आहे काय? विशेष अभ्यास कोयना जलविद्युत प्रकल्प
प्रा.डॉ.विश्वनाथ पांडुरंग पवार
सौ.सुषमा देवानंद पवार ११०
४०. क्रांतिसिंह नाना पाटील आणि १९६२ चे भारत चीन युध्द
प्रा.डॉ.सुमित संभाजी यादव ११७
४१. गुरव स्त्रियांचे गावगाड्यातील स्थान
डॉ.संघमित्रा विठ्ठलराव सरवदे पाचपिंडे ११९
४२. कोहिनूर हिऱ्याचा इतिहास
डॉ.मधुकर विठोबा जाधव १२१
४३. प्रा.डॉ.एन.डी.पाटील रयतचे आधारवड
श्री.चंद्रकांत बाबूराव कुंभार १२५
४४. महात्मा फुले यांचा शेतकरी विषयक दृष्टिकोन
श्री.राजू जगन्नाथ लोखंडे १२७
४५. पुण्यातील शिवस्मारक आणि तत्कालीन वैचारिक संघर्ष
डॉ.सोपान शेंडे १२९
४६. घिसाडी जमात-स्थानिक इतिहासाच्या दृष्टिकोनातून
प्रा.रमेश सोनू झरेकर १३३
४७. भारतीय चित्रपटसृष्टीतील महाराष्ट्र फिल्म कंपनीचे योगदान.
प्रा.हमीद उमरअली काझी १३६

# ४४. महात्मा फुले यांचा शेतकरी विषयक दृष्टिकोन

**श्री.राजू जगन्नाथ लोखंडे**
**संशोधक विद्यार्थी**
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

**प्रास्ताविक :** भारत हा कृषी प्रधान देश आहे. भारतीय जनजीवन शेती व्यवस्थेवर अवलंबून असून शेतकरी जीवन व त्याची शेती कसण्याची पद्धत, त्याचा समाज, सरकार, व्यापारी यांच्याकडून होणारी कुचंबना या विषयावर विचार करणारा क्रांतिकारक नेता म्हणून महात्मा फुले यांना ओळखले जाते. भारतात त्यांनी सर्व प्रथम शेतकरी वर्गाबद्दल क्रांतीकारी विचार मांडले व शेतकऱ्यांवर होणारे अन्यायास वाचा फुटावी यासाठी 'शेतकऱ्याचा आसूड' हे पुस्तक लिहिले. प्रस्तूत शोधनिबंधामध्ये शेतकरी वर्गाच्या समस्या, जीवन पध्दती त्याच्यावर होणारे अन्याय, जमीन कसण्याची पद्धत तसेच शेतकरी वर्गाचे शोषण इत्यादी बाबत महात्मा फुले या दृष्टिकोन या विषयावरती दृष्टिक्षेप टाकण्यात आला आहे.

**शेतकऱ्यांचा असूड ग्रंथाची पार्श्वभूमी :** भारतात १९ व्या शेतकात शेतकरी जीवनाचा मध्यवर्ती विषय ठेवून शेतकऱ्याचा आसूड हा ग्रंथ महात्मा जोतिराम फुले यांनी लिहिला. शेती आणि शेतकऱ्यांचे प्रश्न त्याविषयी प्रत्यक्ष निरिक्षण, अभ्यास आणि चिंतन करून समग्र शेतकरी वर्गाविषयी लेखन करणारा भारतातील पहिला विचारवंत म्हणून फुले यांनाच मान द्यावा लागेल. ब्रिटिश राजवटीत महसूल व्यवस्थेतून शेतकऱ्यांचीहोणारी पिळवणूक, दुष्काळ सावकारी पाशा, जमिनीचे तुकडीकरण, जंगलविषय जाचक कायदे, भाऊबंदकी न कसणाऱ्या वर्गाकडे होणारे जमिनीचे हस्तांतरण, डोईजड कसारा, ब्रिटिश सरकारचे शेतीविषयक धोरण, शेतकऱ्यांची मानसिक भम्रिष्टावल्या इत्यादी बार्बीचा सखोल विचार केला आहे. [१]

भांडवलशाहीमध्ये खाजगी मालकीचे ताव कृषी क्षेत्राला लागू करण्यात आल्यानंतर खेड्यातील अर्थव्यवहारामध्ये फार मोठा बदल घडून आला आणि त्यामधूनच शेतीच्या ऱ्हासाला व अवनतीला प्रारंभ झाला.

**शेतकऱ्यांची धर्माकडून अमिषे व लुबाडणूक :** भारतामध्ये १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात भारतीय समाजव्यवस्थेचा कणा असलेला शेतकरी वर्ग धार्मिक अध्यक्षतेखाली कसा भरडला जात आहे या विषयक फुले यांनी परखड भाषेत धार्मिक ग्रंथ मनुस्मृतीतील कायद्यांना कडाडून विरोध केला. शेतकरी वर्गास शुद्रादी अतिशुद्र समजून ब्राम्हण वर्गांनी शेतकरी वर्गाच्या मुलाच्या शिक्षणावरती बंदी घातली व शेतकऱ्यांच्या घामावर ऐतखाऊ भर ब्राम्हणांनी शेतकऱ्यांना शिक्षणापासून वंचित ठेवले याविषयी महात्मा फुले म्हणतात. [२]

विद्येविना मती गेली। मती विना निती गेली ।।
नितीविना गती गेली। गति विना वित्त गेले।।
वित्तविना शुद्र खचले । एवढे अनर्थ एका अविद्येने केले ।।

तसेच अंध्दश्रध्देतूनही शेतकरी कुटुंबाचे शोषण गर्भदान, ऋतूशांती, विवाहाचे विधी, ग्रहशांती, अमवस्या, चतुर्थी, पौर्णिमा, जपानुष्ठाने, संकल्प, सत्यनारायण पूजा, वास्तूशांती इत्यादी विधीतून ब्राम्हण वर्गाची मोठ्या प्रमाणात कमाई होत असल्यामुळे महात्मा फुले यांचा दृष्टिकोन अंध्दश्रध्दा रूढी परंपरा नष्ट करून शैक्षणिक दृष्ट्या शेतकरी वर्ग सधन झाला पाहिजे असा होता. [३]

सृष्टीचा विकास क्रम आणि ब्रिटिश सत्तेचे आगमन फार मोठा प्रभाव होता. थॉमस पेन यांच्या मानवाचे अधिकार, डार्विनचा उत्क्रांतीवाद आणि हर्बर्ट स्पेन्सर यांच्या सिध्दांतानुसार मानवी समाजाची जडण-घडण पिढीजात होत नसून गुण विभागणीवर होत असते.त्यामुळे महात्मा फुले यांनी जाती व्यवस्थेला विरोध करून शेती व्यावसायाशी निगडीत शेतकरी वर्गात सर्व क्षेत्रामध्ये संचार करता आला पाहिजे, ब्राम्हणी विचारसरणीचे बांडगूळ कारण फेकले पाहिजे व शेतकऱ्यांच्या मुलांना राज्यकारभार, चौकरी, उद्योग व्यावसायाचे स्वातंत्र असावे असा परखड दृष्टिकोन होता. परंतु ब्रिटिश आमदानित सरकारने जंगलाविषयक जाचक कायदे करून ब्राम्हण वर्गाची मोठ्या प्रमाणावर लुबाडत असत या व्यवस्थेविषयीही त्यांनी सुक्ष्म अवलोकन करून मायबाप सरकारच्या कारस्थान युरोपियन कामगाराच्या माथ्यावर फोडताना महात्मा फुले म्हणतात, आपली विलायती अष्टपैलू अक्कल सर्व खर्ची घालून जंगल खाती निर्माण केली. त्याच्या हाताखाली ब्राम्हण लोक काम करू लागले आणि दोघांनी मिळून शेतकरी वर्गाचे शोषण केले. [४]

**गरीब शेतकऱ्यांची विपन्नावस्था :** ब्रिटिश राजवटीमध्ये गरीब शेतकऱ्यांवरील अन्यायाला वाचा फोडणारा आणि त्याच्या जिवनाचे प्रतिनिधी इतिहासामध्ये रेखाटणारा विचारवंत म्हणून फुले यांनी शेतकरी वर्गातील सूक्ष्म घटकाकडेही सर्वांचे लक्ष वेचले आहे. अर्थिक टंचाई, निरक्षता, दुष्काळ, उपासमार शेतकऱ्यांच्या आत्महत्या आणि भाऊबंदकी यातून गरीब शेतकऱ्यांच्या कौटुंबिक हाल अपेष्ठाची चर्चा केली आहे. शेतकऱ्यांच्या घरची विपन्नावस्था मोडकळीस आलेले घर, त्यातील बारीक-सारीक चीज वस्तू उपकरणे, औजारे आणि अठरा विश्वे दारिद्र्य, जमिनीची दैना, परिस्थितीपायी पेरणीच्या हुकलेल्या वेळा, खंताअभावी गेलेले पिक, खल्लड झालेले पशुधन, महामारीच्या साथी, दुष्काळ, अडती-दलाल आणि पोलीस पाटलांचे गुंड, सावकाराची कर्ज वसुलीचा सर्वांच्या जाळ्यामध्ये शेतकरी आडकत असे. त्यास भारताची सामाजिक व्यवस्था म्हणजे ब्राम्हण

वर्ग जमिनदार वर्ग जबाबदार आहे. असे दृष्टिकोन महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांचा असूड या ग्रंथात स्पष्ट केला आहे.[४]

**शेती व शेतकरी जीवन यांचे समग्र आकलन :** महात्मा फुले यांनी शेतकरी आणि ग्रामीण ... ग्रामीण अर्थव्यवस्था बलशाली होती. ... शेतीविषयक ... विचार सांगितले. ब्रिटिशांच्या आगमनापूर्वी भारतामध्ये ग्रामीण अर्थव्यवस्था ... वर्गास अनुकूलहोते. थोडक्यात रब्बी पेरणी खरीप पेरणी वेळेवर होत आलेले. तसेच ... शेतकरी ... उपलब्ध करून दिले जात आहे. शेतकरी बिनदास्त शेती करत असत. पाऊस काळात मोठ्या ... पोषक सेंद्रिय खत मिळते. तसेच जनावरांच्या शेणामुत्राचे उत्तम खत शेतीस मिळत असे.[६] ... गोवऱ्या वापरून उत्कृष्ट खताची निर्मिती होत आले. ... रस्त्याच्या दुतर्फा झाडे लावत. तसेच शेतीच्या बांधावरही झाडे लावली जात असत. ... नाले, कालवे बांधून शेतीला पाणी पुरवठा केला जात असे. परंतु ब्रिटिश ... नवीन जमिनदार वर्गाचा उदय यामुळे शेतकरी वर्गाचे स्वालंबन नष्ट झाले आणि ... व्यवस्थेवर पडला व शेती आणि शेतकरी यांचे ग्रामीण अर्थव्यवस्थेला धक्का बसला.[७]

**ब्रिटिश साम्राज्यशाही अर्थव्यवस्थेचे दुष्परिणाम :** ब्रिटिशांनी भारतात साम्राज्यवादी सत्ता स्थापन केल्यानंतर भारतामध्ये ... औद्योगिकी करण भांडवलशाही, अर्थव्यवस्था इत्यादी एकाधिकारशाही व्यवस्थेची निर्मिती केली. या व्यवस्थेचा दुष्परिणाम ... वर्गावर झाला. त्यामध्ये शेतकरी पारंपारिक शेती ऐवजी आधुनिक पद्धतीने शेती करू लागला. त्याचा परिणाम शेतकऱ्यांच्या शेती ... भारत हा कच्चा माल निर्यात करणारा देश व पक्का माल आयात देश बनला.[८] भारतातून इंग्लंडमध्ये कापूस मोठ्या प्रमाणावर ... जात असे व भारतीय शेतकऱ्यांवर कापूस, तीळ, ऊस, चहा, तंबाखू ... ब्रिटिश सरकारने केली. ... भारतामध्ये शेतकरी ग्रामीण अर्थव्यवस्थेत व्यवहार हा वस्तुविनिमय पद्धतीने करीत. परंतु ब्रिटिश ... भारतीय खेडी जागतिक बाजार पेठेशी जोडली गेल्यामुळे शेतकरी अधिक कर्जबाजारी झाला.[९] ब्रिटिश सरकारने शेतकऱ्यांना ... गळचेपीचे धोरण स्वीकारले, त्या शेतकऱ्यांच्या विपन्नावस्थेत वाढ झाली. ... दुष्काळ, शेतीची ... मुळगामी परिणाम भारतीय शेतकरी जीवनावरती झाले असा परखड दृष्टिकोन महात्मा फुले यांनी ब्रिटिशसरकार पुढे मांडला.

**महात्मा फुले यांचे शेतकरी वर्गाविषयी विचार व आजचा शेतकरी जीवन :** महात्मा फुले यांनी १९ व्या शतकातील शेती ... यांच्या वास्तव जीवनाबद्दल आपला दृष्टिकोन मांडला असला तरी आजच्या भारतातील शेती व शेतकरी जीवन ... फुले यांनी ब्रिटिश सरकारला सुचविलेल्या योजना स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये भारत सरकारने प्रत्यक्षात अवलंब केलेल्या दिसून येतो. ... पाटबंधारे, नालाबिल्डींग, शेततळी इत्यादी सिंचनाच्या साधनामधून पाणी अडवा व पाणी जिरवा या सारख्या योजना महाराष्ट्र शासनाने ... आहेत. यामुळे सिंचन साधनामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली. परंतु ... भावले नाही.[१०] साखर कारखानदारी, रासायनिक खताचा अतिरेक, दुष्काळ, ... सरकारची उदासीनता यांचा आजही शेतकऱ्यांना ... करावा लागत आहे. ब्रिटिशसत्तेच्या जागी भारतीय सत्ताधिशांनी शेतकरी वर्गाचे शोषण थांबविले नाही. त्यामुळे महात्मा फुले यांचा शेतकरी ... दृष्टि सखोल व काळाच्या पुढच्या असलेली दिसून येते.

**संदर्भ :**


१. खातू गजानन, देशव्यापारी दुष्काळाचा सामना, साधना साप्ताहिक ५ सप्टेंबर २००९ पुणे.
२. चौसाळकर अशोक, महात्मा फुले आणि शेतकरी चळवळ, लोक वाङ्मय प्रकाशन, मुंबई १९९०, पृ. १६.
३. जोशी शरद, शेतकऱ्यांचा असूड, शतकाचा मुजरा शेतकरी प्रकाशन, अलिबाग १९८३, पृ.५८.
४. देशपांडे जी.पी.(संपा.), सिलेक्टेड रायटिंग्ज ऑफ जोतिराव फुले, लेफ्टवर्ड प्रकाशन नवी दिल्ली २००२, पृ.१४८.
५. देसाई ए. आर. :सोशल बॅक ग्राऊंड ऑफ इंडियन नॅशनॅलिझम, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई १९७६, पृ.१७२.
६. पळशीकर वसंत : जोतिबांनी शेतकऱ्यांच्या वतीने शंभर वर्षापूर्वी उगारलेला असूड, आजच्या चार्वाक दिवाळी अंक १९८३, पृ.३२
७. फडके य.दि.(संपादित) महात्मा फुले आणि समग्र वाङ्मय महाराष्ट्र राज्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई १९९१, पृ. ५६.
८. भोळे भास्कर लक्ष्मण, महात्मा जोतिराव फुले-वारसा आणि वसा, संकेत प्रकाशन, औरंगाबाद २००७, पृ. ४९.
९. भोळे भास्कर लक्ष्मण, जोतिरावांचे शेतकरी विषयक धोरण उपेक्षिल्याचेच परिणाम, नंदू लावंड (संपा.), शेतकऱ्यांच्या आत्महत्या आणि उपाय, सुमेरू प्रकाशन, डोंबिवली, २००७, पृ.१२८.
१०. सरदार ग.बा., महात्मा फुले व्यक्तिमत्त्व आणि विचार, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई.